व्हीपीपीएलकडून स्थानिक समुदायासाठी सर्व्हिस रोडची घोषणा; आर्थिक विकासाला चालना

मुंबई, २९ जुलै २०२५ : महाराष्ट्रातील वाढवण येथे भारतातील पहिले मेगा पोर्ट व १३वे मेजर पोर्ट विकसित होत आहे. सदर बंदराच्या संचालक मंडळाची मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये रस्ते पायाभूत सुविधांच्या विकासाच्या कामास प्रारंभ करण्याची घोषणा केली. सर्वसमावेशक विकासासाठी व्हीपीपीएलच्या कटिबद्धतेचा हा आणखी एक टप्पा आहे. या निर्णयामुळे वाढवण बंदर प्रकल्पाबरोबरच परिसरातील स्थानिक समुदायांनाही थेट लाभ होणार आहे.

प्रस्तावित वाढवण पोर्ट पासून नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) वरोर पर्यंत विकसित होणाऱ्या आठ पदरी एनएच-248एस महामार्गासाठी भू-संपादन प्रक्रिया सुरू आहे. हा महामार्ग तवा येथे एनएच-8 आणि चिंचारी येथे मुंबई-वडोदरा एक्सप्रेसवे या मार्गांशी जोडला जाईल. हा महामार्ग केवळ मालवाहतुकीसाठीच नव्हे, तर प्रादेशिक विकास आणि दळणवळणासाठी एक प्रमुख मार्ग बनणार आहे.

या व्यतिरिक्त, व्हीपीपीएल पोर्टच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली वाहतूक सुलभ करण्यासाठी दोन लेनचा स्वतंत्र सर्व्हिस रोड तयार करण्यात येत आहे. हा रस्ता स्थानिक नागरिकांनाही खुला असणार असून त्यामुळे परिसरातील सध्याची वाहतूक सुलभ होणार आहे. स्थानिक नागरिकांच्या मागण्या व सूचनांचा विचार करून या योजनेत अंडरपास, क्रॉस पैसेज, उड्डाणपूल, रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) आणि सर्व्हिस रोड यांचा समावेश केला जाणार आहे. हा संपूर्ण रस्ता स्थानिक रहिवाशांसाठी टोलमुक्त
असेल.

“जागतिक दर्जाचे पोर्ट उभारणे हे आमचे उद्दिष्ट आहेच, पण त्याचबरोबर या प्रकल्पाच्या वाढीचा सकारात्मक परिणाम परिसरातील स्थानिक समुदायांवरही व्हावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,” असे श्री. उन्मेष शरद वाघ, भा.रा. से, अध्यक्ष, जेएनपीए व व्यवस्थापकीय संचालक, व्हीपीपीएल यांनी सांगितले.

“हे रस्ते प्रकल्प वाढवण आणि शेजारच्या परिसरातील नागरिकांप्रती आमची कृतज्ञता दर्शवतात. सुधारित संपर्क सुविधांमुळे स्थानिक व्यवसायांना चालना मिळेल, शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सुलभ होतील, तसेच नव्या उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील. हा टोलमुक्त व सर्वहवामानात वापरता येणारा ग्रीनफिल्ड दोन लेनचा मार्ग असेल या मार्गामुळे शेतकरी, डायमेकर आणि मासेमारी करणाऱ्या लोकांसाठी व्यवसाय करणे सुलभ होईल व बाजारपेठेपर्यंत सहज पोहोचता येईल,” असेही त्यांनी पुढे नमूद केले.

संपूर्ण चित्र पाहता, हा सर्व्हिस रोड स्थानिक व्यापार आणि सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी एक प्रेरक घटक ठरण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांपर्यंत असलेली सुधारित जोडणी मालवाहतुकीला गती देईल, स्थानिक व्यवसायांसाठी नवीन बाजारपेठा खुल्या करतील, तसेच

साहाय्यक उद्योग व सेवा क्षेत्र आकर्षित करतील. परिणामी, या संपूर्ण परिसरात सकारात्मक विकासाचा अनुक्रम निर्माण होईल.

व्हीपीपीएल जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यास कटिबद्ध आहे, आणि त्याचबरोबर स्थानिक अपेक्षा व गरजांशी सखोल नातं जपत पुढे वाटचाल करत आहे.
व्हीपीपीएल बद्दलः

वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) हे देशाचे १३वे मोठे बंदर असून, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड (MMB) यांच्या संयुक्त भागीदारीत स्थापन करण्यात आलेले एक विशेष उददिष्ट असलेले कंपनी रूपातील उपक्रम आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ वसलेले हे बंदर जागतिक स्तरावर आघाडीच्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवण्यास सक्षम आहे. ३० ऑगस्ट २०२४ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बंदराच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक क्षण घडला.

निसर्गपूरकतेला प्राधान्य देत, वाढवण बंदर हे शंभर टक्के हरित तत्त्वावर आधारित असणार आहे, जे पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करत अधिक कार्यक्षमतेने काम करेल. २४ दशलक्ष टीईयू (TEU) माल हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर देशाच्या व्यापार कार्यक्षमतेला गती देणार आहे. या माध्यमातून आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि परिसराचा सर्वांगीण विकास होईल. वाढवण पोर्ट कौशल्य कार्यक्रमांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक समुदाय सशक्त करण्यावर वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड विशेष भर देत आहे.

माध्यम प्रतिनिधींनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावाः

अंबिका सिंग,

उपमहाव्यवस्थापक (कॉर्पोरेट कम्युनिकेशन व प्रशिक्षण),

वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड

मोबाईल क्र. : +919920372677

ईमेल: ambikasingh@inport.gov.in

VPPL Announces Service Road Construction to Support Local Community and Economic Growth

Mumbai, July 29, 2025: Vadhvan Port Project Limited (VPPL)- the 13th major port of India has announced the commencement of road infrastructure development on Tuesday, July 29th, 2025, during the VPPL Board Meeting, reflecting the company's continued commitment to inclusive development. This decision is aimed at benefiting both the Vadhvan Port construction and the surrounding local communities.

The National Highways Authority of India (NHAI) is in the process of land acquisition for the 8-lane NH-248S highway, originating from the upcoming Vadhvan Port at Varor, and seamlessly connecting to NH-8 and the Mumbai-Vadodara Expressway at Tawa and Chinchari, respectively. This strategic connectivity will serve as a major corridor, not just for freight, but also for regional development and accessibility.

In addition to this, VPPL is constructing a dedicated two-lane service road to facilitate the port's construction activities, which will also be accessible to the local public, thereby easing current transportation in the region. In response to the requests and suggestions from the community, essential facilities such as underpasses, cross passages, flyovers, Road Over Bridges (ROBs), and service roads will be incorporated into the road plan, which will be toll-free for the local population.

"Our aim is not only to build a world-class port but also to ensure that its growth positively impacts the communities around it," said Shri Unmesh Sharad Wagh, IRS, Chairperson, JNPA and CMD, VPPL. "These road projects reflect our appreciation for the people of Vadhvan and neighbouring areas. The improved connectivity will support local enterprises, strengthen access to education and healthcare, and open up better livelihood opportunities. This toll-free, all-weather greenfield two-lane road will also help farmers, die-makers, and the fishing community by easing movement and expanding access to markets," he added.

From a broader perspective, these service road links are expected to act as a catalyst for local commerce and socio-economic upliftment. Improved access to national highways and expressways will facilitate the smoother movement of goods, open new markets for local businesses, and attract ancillary industries and services, thereby creating a positive ripple effect throughout the region.

VPPL remains steadfast in its vision to build infrastructure that not only meets global standards but also strengthens its roots in local aspirations.

About VPPL:

Vadhvan Port Private Limited (VPPL) is the 13th major port of India, a special purpose vehicle (SPV) formed between Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) and the Maharashtra Maritime Board (MMB). Strategically located in Palghar district, near Dahanu, Maharashtra, VPPL is poised to be among the top 10 ports globally. The foundation stone for the port was laid on August 30th, 2024, by the Hon'ble Prime Minister of India, Shri Narendra Modi.

Committed to sustainability, VPPL will be 100% green from inception, ensuring minimal environmental impact. The port is set to enhance trade efficiency with the capacity to handle 24 million TEUs, stimulate economic growth, and contribute to regional development. Through initiatives like the Vadhvan Port Skilling Program, VPPL focuses on empowering local communities.

For Media Queries, Contact:

Ambika Singh,
DGM(Corporate Communications & Training), Vadhvan Port Project Ltd.
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in